# भूमिगत मेट्रोला अर्थबळ

## वाढीव खर्चासाठी मिळणार 'जायका'ची अतिरिक्त रसद

- केंद्र-'जायका'मध्ये पाचव्या टप्प्यासाठी करार
- ३७ हजार कोटींपैकी 'जायका'ची रक्कम २१ हजार कोटींवर
- 'एमएमआरसी'ची आर्थिक गरज भागल्याने प्रकल्पाला वेग

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

विलंबामुळे ६० टक्के खर्चवाढ झालेल्या आरे ते कफ परेड या भूमिगत मेट्रोला (मेट्रो ३) 'जायका'कडूनही अतिरिक्त निधीची रसद मिळाली आहे. या प्रकल्पासाठी पाचव्या व अखेरच्या टप्प्यातील कर्जाऊ वित्त साह्याचा करार 'जायका'ने शुक्रवारी केंद्र सरकारशी केला. त्यानुसार, आता ३७ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पातील 'जायका'च्या वित्तसाह्याचा आकडा २१ हजार कोटी रुपयांवर, म्हणजे एकूण खर्चाच्या ५२ टक्क्यांवर जाणार आहे.

आरे ते कफ परेडमार्गे विमानतळ, सांताक्रुझ, बीकेसी, दादर, काळबादेवी अशी ३३ किमी लांबीची 'मेट्रो ३' ही राज्यातील सर्वाधिक लांब भूमिगत मेट्रो मार्गिका आहे. प्रारंभी २३ हजार १३६ कोटी रुपये खर्चाच्या या मार्गिकेला भूसंपादनाशी निगडित आंदोलनासह अन्य कारणांमुळे दोन वर्षांहून अधिक विलंब झाला. त्यामुळे मार्गिकेचा खर्च २०२१ मध्ये ३३ हजार ४०६ कोटी रुपयांवर गेला. त्यानंतर गेल्या तीन वर्षांतील विलंबामुळे खर्चात पुन्हा ३८७० कोटी रुपयांची वाढ झाली. यामुळे या मार्गिकेचा एकूण प्रकल्पखर्च ३७ हजार २७५.५० कोटी रुपयांवर गेला. प्रारंभीच्या खर्च मंजुरीनुसार प्रकल्पासाठी 'जायका'कडून १३ हजार २३५ कोटी रुपये कर्जाऊ वित्तसाह्य मिळाले. आता ६० टक्के खर्चवाढीमुळे आणखी ८०४५ कोटी रुपयांच्या कर्जाची गरज 'एमएमआरसी'ला होती. ती गरज 'जायका'कडून तातडीने भागविण्यात आली आहे.

'जायका'ने आतापर्यंत या प्रकल्पासाठी चार टप्प्यांत एकूण २ लाख ६९ हजार ८७१ दशलक्ष जपानी येन, इतके वित्तसाह्य दिले आहे.

भारतीय रुपयांत हा आकडा जवळपास १४ हजार कोटी रुपये आहे. त्यानंतर शुक्रवारी 'जायका'ने पाचव्या व अखेरच्या टप्प्यात ८४ हजार २६१ दशलक्ष जपानी येन, वित्तसाह्य करण्यासाठी केंद्र सरकारशी करार केला. या पाचव्या टप्प्यातील वित्तसाह्य ४४७४ कोटी रुपये इतके असेल. 'जायका भारत'चे मुख्य प्रतिनिधी सैतो मित्सुनुरी व केंद्रीय आर्थिक व्यवहार विभागाच्या अतिरिक्त सचिव मनिषा सिन्हा यांनी करारावर स्वाक्षरी केली. यामुळे या प्रकल्पाचा मार्ग सुकर झाल्याचे मानले जाते.



> 'मेट्रो ३' हा मुंबईचे रुपडे पालटणारा प्रकल्प आहे. प्रकल्पाला विलंब झाला असला तरी, फार अडचणी येणार नाहीत. मुंबईकरांचे आयुष्य बदलण्यासाठी हा प्रकल्प जितका आवश्यक आहे, तितकाच तो 'जायका'साठीही महत्त्वाचा आहे.
>
> **सैतो मित्सुनोरी**, मुख्य प्रतिनिधी, जायका भारत

### 'मेट्रो ३' साठी 'जायका'चे साहाय्य असे

| करार वर्ष | रक्कम (जपानी येन) |
|---|---|
| २०१३ | ७१ हजार दशलक्ष |
| २०१८ | १ लाख दशलक्ष |
| २०१९ | ३९,९२८ दशलक्ष |
| २०२४ | ५८,९४३ दशलक्ष |
| २०२४ | ८४,२६१ दशलक्ष |
| एकूण | ३,५४,१३२ दशलक्ष (जवळपास २१ हजार कोटी रु.) |



### तीन दिवसांत हालचाली

या प्रकल्पाच्या वाढीव खर्चाला व त्यादृष्टीने आवश्यक असलेल्या 'जायका' वाढीव वित्तसाह्याला राज्य सरकारने २ जुलैच्या शासननिर्णयाद्वारे मंजुरी दिली होती. या निर्णयाच्या तीन दिवसांतच 'जायका'ने वाढीव वित्त मदतीसाठी केंद्राशी करार केला. त्यानंतर आता केंद्रामार्फत हा पैसा 'एमएमआरसी'कडे येईल. यासंबंधीचा प्रस्ताव मात्र 'एमएमआरसी'ने याआधीच पाठवला होता, अशी माहिती संबंधितांनी दिली.